# दावीद त्याच्या दुष्ट शत्रूंची क्षमा करतो

मुलांचे वय व गरजा लक्षात घेऊन त्यानुसार कृती निवडा. तसेच तुम्हांला हव्या त्या क्रमाने निवडलेल्या कृती करा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभु आम्ही तुझ्यासारखे पवित्र शुद्धता व प्रेम ह्यांनी परिपूर्ण असावे अशी तुझी इच्छा आहे. दावीदाचे उदाहरण समोर ठेवून तुझ्या आत्म्याच्या सामर्थ्याने आम्ही कशा प्रकारची व्यक्ती व्हावे अशी तुझी इच्छा आहे त्यासाठी आमचे सहाय्य कर. आमच्या पातकांची आम्हांला क्षमा कर आणि दावीदासारख्या लोकांनी केली तशी इतरांना क्षमा करण्यास आमची मदत कर. आमेन.''



**शिकवण्याची तयारी करा.** प्रकटी 7:9-17 मधून स्वर्गाविषयी वाचा, तेथे आम्ही पांढऱ्या शुभ्र रंगाचे कपडे घालणार आहोत.

**चित्र** काढा शेजारी दाखवले आहे त्याप्रमाणे झग्याचे चित्र काढून मुलांना तसे काढण्यास सांगा.

- ह्या झग्यावरून असे दिसते की आम्हांला आपली पवित्रता व प्रीती ह्यांचे कपडे घालण्याची देवाची इच्छा आहे.
- देव आम्हांला पांढरे शुभ्र कपडे देणार आहे. त्यावरून आम्ही त्याच्या नजरेत पवित्र, शुद्ध व चांगले असावे याकरीता त्यानं आम्हांला कसे घडवले हे समजते.
- दावीदाने त्याचा शत्रू शौल ह्याला कशी क्षमा केली हे वाचून दाखवा किंवा आठवून सांगा (1 शमु. 24:1-22).
- हा वृत्तांत वाचून दाखण्यासाठी किंवा लक्षात ठेवून वाण्यासाठी एका मोठया मुलाची अगोदरच तयारी करून घ्या.
- वृत्तांत सांगण्यास सुरूवात करण्यापूर्वी मुलांना तो वृत्तांत काळजीपूर्वक ऐकण्यास सांगून दावीदने त्याच्या शत्रूला कशी सन्मानाची वागणूक दिली त्याकडे लक्ष देण्यास सांगा.

**मुलांना विचारा:**

- दावीदाचे काय करावे असे दुष्ट शौल राजाला वाटत होते?
- दावीदाला त्याचा शत्रू शौल राजाला मारण्याची कोणती संधी मिळाली?
- दावीदाने त्याच्या शत्रूवर सूड उगवला का?
- दावीदाने दडपशाही करून स्वत:ला इस्राएलाचा राजा करण्याचा प्रयत्न केला का?
- दावीदाने शौलाला जीवे न मारता सोडून दिल्यावर तो कशा प्रकारचा मनुष्य आहे असे शौलाने सांगितले?
- दावीदाला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्यावर शौलाला वाईट का वाटले? लहान मुलांना मत्तय 5:44 हे वचन तोंडपाठ करण्यास सांगा.

लहान मुलांना **मत्तय 5:44** वचन तोडपाठ करण्यास सांगा.

मोठया मुलांना **गलती 5:22 व 23** ही वचने तोडपाठ करण्यास सांगा.

**कविता.** तीन मुलांना स्तोत्र 15 मधील 1, 2 व 3 ही वचने प्रत्येकी म्हणायला सांगा.

दावीद शौलाला क्षमा करतो ह्या प्रसंगाचे **नाट्यीकरण करा** (1 शमूवेल अध्यास 24)

- नाटकाची चांगली तालीम करा म्हणजे उपासनेच्या वेळी ते मोठया लोकांसमोर सादर करता येईल.

- ह्या नाटकाच्या तालमीतून मुलांना शिकायला मिळेल असे पाहा.
- शक्या असेल तर एक किंवा दोघां मोठया माणसांना मुलांबरोबर सैनिक म्हणून भूमिका करण्यास सांगा.
- शौल किंवा दावीद अथवा सैनिक काय म्हणाले असतील याची कल्पना मुले करीत असतील तर त्यांना पुढे दिलेले संवादच म्हटले पाहिजेत अशी मर्यादा घालू नका शौल किंवा दावीद काय म्हणाले असतील हे मुलांना त्यांच्या स्वत:च्या शब्दात सांगू द्या.
- मोठया मुलांना लहान मुलांची तयारी करून देण्यास सांगा.
- नाटक सादर करून झाल्यावर त्यावरील प्रश्न मुलांना मोठया लोकांस विचारू दया.
- मोठया मुलांना (किंवा पुरूषांना) पुढील भुमिका द्या.

**शौल,** एखादे ब्लँकेट अथवा चादर 'झग्या' सारखे घाला.

**दावीद** (एखादया मोठया मुलाला ही भूमिका द्या.) लाकूड किंवा पुठ्ठयापासून एक तलवार तयार करा. तसेच शौलाने घातलेल्या झग्याच्या रंगाचा एक कापडाचा तुकडा मिळवा. तुम्ही शौलाच्या अंगरख्याचा तुकडा तलवारीने कापून धेण्याचा अभिनय करीपर्यन्त तो तुकडा तुमच्या हातात ठेवा.

- **शौलाचे सैनिक** (लहान मुलांना ह्या भूमिका करायला द्या, एखादी प्रौढ व्यक्ती वा मोठा मुलगाही एखादया सैनिकाची भूमिक करू शकतो)
- **दावीदाचे सैनिक** (लहान मुले; मोठी माणसे किंवा मोठया मुलांना ह्या भूमिका करता येतील)

## नाटिका

**दावीद व त्याचे सैनिक:** शौलाच्या नजरेस पडू नका. खोलीच्या एका बाजूला झुडपाप्रमाणे रचून ठेवलेल्या खुर्च्यांच्या मागे लपून बसा.

**शौल:** तुम्ही तुमचे सैनिक घेऊन दावीद लपला आहे त्या दिशेने जा पण विरूद्ध बाजूला पाहा. मोठयाने ओरडा, ''माझ्या शूर सैनिकांनो ऐका! मी दावीदाचा द्वेष करतो लोक माझ्यापेक्ष्ना त्याचीच अधिक स्तुती करतात! पण मी राजा आहे! मी शौल राजा आहे! जा त्या दावीदाला शोधा आणि मारून टाका आताच्या आत्ता जाऊन त्याला ठार करा!''

**शौलाचे सैनिक:** शौलाला सलामी द्या! मोठयाने म्हणा, ''होय सरकार!'' ''होय, राजाधिराज.'' ''आम्ही त्याला ठार करू!'' ''मला वाटते आपण ह्या बाजूने जाऊ या चला!'' (दावीद व त्याचे सैनिक लपले असतील तेथून कूच करा. दावीदाल शोधत इकडे तिकडे फिरा शौल आहे त्याच जागी अभा राहतो.)

**शौल:** तुमचा अंगरखा काढून तुमच्या बाजूला ठेवा. त्याकडे पाठ करून डोळे मिटून बसा. झोपल्याचा अभिनय करीत तुमचे डोके तिरके करा.

**दावीदाचे सैनिक:** ''दावीद, ते पाहा! तुमचा शत्रू शौल तिथे आराम करत झोपला आहे.'' ''दावीद त्याला जाउुन मारा''

**दावीद:** हळूच आवाज न करता हातात तुमची तलवार घेऊन शौलाच्या मागे जा.

**दावीदाचे सैनिक:** ''वाट कसली बघता! ठार करा त्याला!'' ''तो तुमचा शत्रू आहे!''

**दावीद:** नाही मी त्याला ठार मारणार नाही तो इस्राएल लोकांचा देवाने अभिषेक केलेला असा राजा आहे.''

**दावीदाचे सैनिक:** ''आत्ता ताबडतोब त्याचा वध करा!'' आयती संधी चालून आली आहे तर फायदा घ्या आणि त्याला मारा!''

**दावीद:** शौलाच्या अंगरख्याचा तुकडा कापून घेतल्याचा अभिनय करा. तो हातात धरा. तुमच्या सैनिकांकडे परत या आणि मग मोठयाने शौलाला हाक मारून म्हणा,'' पाहा, महाराज! तुमच्या अंगरख्याचा तुकडा

माझ्या हातात आहे! मी तो कापून घेतला पण मी तुम्हांला ठार मारले नाही. यावरून माझ्या मनात काही दुष्ट हेतू वा कपट नाही. मी तुमचा काहीही अपराध केला नाही तरीही तुम्ही माझा जीव घ्यायला टपून बसलात.''

**शौल:** ''माझ्या मुला, दावीद तू आहेस होय? माझे चुकलेच बाह!''

(डोळे पूसा) ''तू माझ्यापेक्षा आधिक नीतिमान आहेस. तू माझ्याशी चांगला वागलास, पण मी मात्र तुझ्याशी वाईट वागलो. परमश्वराने मला तुझ्या हाती दिले तरी तू मला मारून टाकले नाहीस. तू खात्रीने इस्राएलाचा राजा होशील हे मला ठाऊक आहे.''

इतरांना क्षमा करण्या विषयीच्या कविता व गीते मोठया मुलांना लिहिण्यास सांगा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net